क्रमांक पोमसं/ २०/ १९५/ लोक सेवा हक्क अहवाल/ ३८४/ २०१७
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
जुने विधान भवन, शहिद भगतसिंग मार्ग,
रिगल सिनेमासमोर, कुलाबा, मुंबई - ४०० ००१
दिनांक :- ११ /१०/२०१९

विषय : महाराष्ट्र लोक सेवा हक्क अधिनियम २०१५ नुसार ऑनलाईन सेवा नागरिकांना प्रदान करण्याबाबत तसेच त्यांच्या प्राप्त अर्जांवर कार्यवाही करण्याबाबत.

** ** ** ** **

परिपत्रक :

दिनांक १८.०९.२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता श्री स्वाधिन क्षत्रिय, भाप्रसे, राज्य मुख्य लोक सेवा हक्क आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नवीन प्रशासकीय भवन, ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई येथे बैठक संपन्न झाली होती. सदर बैठकीमध्ये खालील मुद्दे चर्चिले गेले.

राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुख यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ नुसार अधिसुचित केलेल्या लोक सेवांची यादीनुसार गृह विभाग करिता खालील नमुद १७ ऑनलाईन सेवा अधिसुचित करण्यात आल्या आहेत.

## महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ नुसार अधिसुचित केलेल्या लोकसेवांची यादी.

**गृह विभाग (१७ सेवा)**

**अधिसुचना क्रमांक एचडीओ ०२१५/ प्र.क्र. ३७/ आस्था १, दिनांक १०.०७.२०१५**

| अ.क्र. | विभाग व सेवांची नांवे | सेवा पुरविण्याचा कालावधी |
|---|---|---|
| १. | विदेशी कलाकारांच्या सहभागास परवानगी | ७ दिवस |
| २. | कागदपत्रांचे साक्षांकन | ७ दिवस |
| ३. | भारतीय नागरिकांचे नोरी (NORI - No Obligation to Return to India) प्रमाणपत्र | ३० दिवस |
| ४. | विदेशी नागरिकांना पोलीस क्लिअरन्स प्रमाणपत्र | ३० दिवस |
| ५. | विदेशी नागरिकांचे नागरिकत्वाचे प्रस्ताव केंद्र शासनास पाठविणे | ३० दिवस |

16/10/19
1796

| अ.क्र. | विभाग व सेवांची नांवे | सेवा पुरविण्याचा कालावधी |
|---|---|---|
| ६. | तक्रारदारास प्रथम खबरी अहवालाची (FIR) प्रत पुरविणे | तात्काळ |
| ७. | ध्वनिक्षेपकाचा परवाना देणे. | ३ दिवस |
| ८. | मनोरंजनाचे कार्यक्रमांना ना हरकत परवाना देणे | २१ दिवस |
| ९. | सभा, सम्मेलन, मिरवणुक, शोभा यात्रा इत्यादीकरिता परवानगी देणे | ७ दिवस |
| १०. | विदेशी नागरिकांना निवासासाठी मुदतवाढ देणे/ ना हरकत प्रमाणपत्र देणे | ७ दिवस |
| ११. | भारत देशात परत येण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे | ७ दिवस |
| १२. | पारपत्र पडताळणीसाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे | २१ दिवस |
| १३. | निमशासकीय, खाजगी संस्था इत्यादीमध्ये नोकरीकरिता वर्तणुक व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र | ३० दिवस |
| १४. | पेट्रोल पंप, गॅस एजन्सी, हॉटेल, बार इत्यादीकरिता ना हरकत प्रमाणपत्र देणे | २१ दिवस |
| १५. | शस्त्र परवान्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे | २१ दिवस |
| १६. | भारतीय नागरिकांना परदेशात जाण्यासाठी पोलीस अनुमती प्रमाणपत्र देणे. शिक्षणासाठी/ नोकरीकरिता प्रवेशपत्र (व्हीसा) | २१ दिवस |
| १७. | तिबेटीयन नागरिकांना भारत देशात परत येण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे | १५ दिवस |

सदरहु बैठकीमध्ये अध्यक्षांनी असे सुचित केले की, उपरोक्त १७ ऑनलाईन लोक सेवांबाबतच्या माहितीचे फलक राज्यातील सर्व पोलीस घटक कार्यालय, पोलीस स्टेशन्स व इतर पोलीस कार्यालय इमारतींच्या दर्शनी भागामध्ये लावण्यात यावेत. सदर फलकामध्ये लोक सेवेच्या प्रकारांची माहिती, संबंधित पदनिर्देशित अधिकारी यांचे नांव व हुद्दा, सदरहु माहिती प्राप्त करुन घेण्याचे शुल्क, माहिती विहित कालावधीत माहिती प्राप्त न झाल्यास कोणाकडे अपिल करावे, प्रथम / द्वितिय अपिलीय अधिकारी व इतर सहाय्यकारी माहिती देण्यात यावी. जेणेकरुन सदर फलकाद्वारे सर्व नागरिकांना या लोक सेवांबाबत परिपुर्ण माहिती होईल.

पोलीस घटकांनी याबाबत विविध विषयांवर आयोजित केलेल्या बैठकांमध्ये व विशेष मोहिम आयोजित करुन सदरहु लोक सेवांबाबत जनजागृती करावी याकरिता परिपत्रक काढण्यात यावे. जनजागृती करण्यासाठी ट्विटर, फेसबुक, व्हॉट्स ॲप या अत्याधुनिक साधनांचा वापर करावा, तसेच मोहल्ला कमिटी, एकता समितीच्या बेठकीचे वेळी सदरहु माहिती लोकांपर्यत पोहोचेल याची दक्षता घ्यावी. प्रादेशिक स्तरावर संबंधित परिक्षेत्रिय अधिका-यांची (Zonal Officers) कार्यशाळा आयोजित करावी तसेच याबाबत काही समस्या असल्यास शासनाच्या तांत्रिक पथकाचे (Technical Team) मार्गदर्शन घ्यावे.

**(Technical Head : Shri Rahul Surve, Co-ordinator, Mobile 74004 23300).**

उपरोक्त १७ लोक सेवापैकी १) तक्रारदारास प्रथम खबरी अहवालाची (FIR) प्रत पुरविणे व २) भारत देशात परत येण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे हया २ सेवा ऑनलाईन नाहीत. याकरिता या दोन ऑनलाईन सेवा पुर्ण करण्यामध्ये काही अडचणी असल्यास त्या शासनास या कार्यालयाच्या मार्फतीने कळविण्यात याव्यात. तसेच इतर लोक सेवांबाबतची माहिती शासनास पोलीस घटकवार संकलित करुन मार्फतीने पाठविण्यात यावी.

प्रथम खबरी अहवालाची प्रत (FIR) सध्या सीसीटीएनएसद्वारे अर्जदारास ऑनलाईन देण्यात येते. सीसीटीएनएस ही प्रणाली केंद्र शासनाने गुन्हे बाबतची माहिती संकलित करण्यासाठी उपलब्ध केलेली असल्यामुळे अध्यक्षांनी सदर लोकसेवा या उपकरणाशी लिंक करण्याबाबतची प्रक्रिया माहिती करुन घेवुन कार्यवाही करण्याबाबत सुचना केली. तरी याप्रमाणे प्रथम खबरी अहवालाची प्रत (FIR) सीसीटीएनएसद्वारे अर्जदारास देता येवु शकेल किंवा कसे याबाबत कृपया पडताळणी करावी व त्याप्रमाणे सदरची लोक सेवा नागरिकांना पुरविण्याचा प्रयत्न करावा.

सदरहु लोक सेवांची परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्याकरिता खालील मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे.

१) सदरहु लोक सेवा हक्क कायदयाचा समावेश पोलीस प्रशिक्षण विदयालयाच्या अभ्यासक्रमामध्ये करण्यात यावा. याबाबत परिपुर्ण माहिती संबंधित प्रशिक्षणार्थी यांना देण्यात यावी व त्याची अंमलबजावणी होत आहे किंवा कसे यावर लक्ष ठेवण्यात यावे.

२) संबंधित लोक सेवा देताना त्या पारदर्शक असाव्यात. संबंधित माहिती देण्याचे काम विहित कालावधीत होणे आवश्यक आहे. एखादी माहिती देण्यास पात्र किंवा अपात्र आहेत याबाबतची माहितीही संबंधितांना त्वरित देण्यात यावी.

३) नागरिकांना उत्कृष्टरित्या लोक सेवा पुरविणा-या तसेच चांगले व उत्कृष्ट कामगिरी करणा-या कर्मचा-यांना व अधिका-यांना योग्य ते प्रोत्साहनात्मक बक्षिस देण्यात यावे.

४) सदरहु लोक सेवा देणे परिणामकारक होण्यासाठी संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण दयावे. गरज पडल्यास जनजागृती शिबीर (अवेअरनेस कॅम्प) आयोजित करावेत.

लोक सेवांबाबतच्या अधिसुचनेमध्ये पदनिर्देशित अधिकारी कोण आहेत, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांची माहिती नमुद आहे. पदनिर्देशित अधिकारी यांनी माहिती नाकारली असल्यास त्याबाबतची समर्पक कारणे देणे आवश्यक आहे. प्रथम / द्वितीय अपिल अधिकारी यांनी माहिती नाकारली असल्यास तसे अर्जदारास कळविणे अपेक्षित आहे. जेणेकरुन अर्जदार शासनास विहित मुदतीत अपिल करु शकतील.

सर्व लोक सेवांबाबतची माहिती कार्यक्षेत्रातील नागरिकांना सर्व पोलीस घटक प्रमुखांनी ट्विटर, फेसबुक, व्हॉट्स ॲप या अत्याधुनिक साधनांचा वापर करुन देण्यात यावी. आणखी काही सेवा नामनिर्देशित करावयाच्या असल्यास त्याबाबतचा आढावा घेण्यात यावा. सर्व पोलीस घटक प्रमुखांनी त्यांच्या कार्यालयांच्या इमारतींमध्ये, पोलीस स्टेशनमध्ये दर्शनी भागात लोक सेवांबाबतचे फलक लावण्यात आले आहेत किंवा कसे याचाही आढावा घ्यावा व परिणामकारकरित्या लोक सेवा नागरिकांना पुरविण्याचा प्रयत्न करावा.

अध्यक्षांनी बैठकीचे शेवटी असे सांगितले की, सध्या अस्तित्वात असलेल्या लोक सेवांव्यतिरिक्त आणखी आवश्यक अतिरिक्त लोक सेवांचा समावेश करून त्यांच्या विभागाची एक मास्टर लिस्ट करावी. नवीन सेवा नामनिर्देशित करावयाच्या असल्यास अतिरिक्त आवश्यक लोकसेवांचा समावेश करावा. तसेच काही सेवा बंद करावयाच्या असल्यास त्याबाबतची सुस्पष्ट कारणे नमूद करून तसा अहवाल शासनास या कार्यालयाच्या मार्फतीने सादर करावा.

मास्टर लिस्ट मध्ये कोणत्या अतिरिक्त लोक सेवांचा समावेश करावा, कोणत्या लोक सेवा बंद कराव्यात याबाबतचा निर्णय घेण्याकरिता पोलीस घटक प्रमुख यांनी तांत्रिक समिती गठित करून त्या समितीद्वारे याबाबतचा निर्णय घ्यावा.

**( मिलिंद भारंबे )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (का. व सु.)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह),
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह),

प्रत माहितीस्तव:-
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक,
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली.